



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १०३ * नांदेड * रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## नारी शक्ती वंदन अधिनियमाचा पराभव हा महिलांचा अपमान -मोदी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नारी शक्ती वंदन अधिनियम ही १३१ वी घटनादुरुस्ती लोकसभेत शुक्रवारी झालेल्या मतदानात पराभूत झाली. घटनादुरुस्ती विधेयक मंजूर होण्यासाठी दोन-तृतीयांश मतांची आवश्यकता असते. पण विरोधकांनी विधेयकाला विरोध केल्यामुळे विधेयकाला दोन-तृतीयांश मते मिळाली नाही. काँग्रेस, समाजवादी पार्टी, तृणमूल काँग्रेस, द्रमुक यांच्या सह विरोधकांनी विधेयकाला विरोध केला. महिलांच्या स्वप्नाला विरोधकांनी चिरडले. पंतप्रधान म्हणून या घटनेसाठी मी देशाच्या नारी शक्तीची जाहीर माफी मागतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. देशाला उद्देशून केलेल्या विशेष भाषणात पंतप्रधान मोदींनी देशातील नारी शक्तीची माफी मागितली.

विरोधकांनी नारी शक्ती वंदन अधिनियम या घटनादुरुस्तीला विरोध करून महिलांचा अपमान केला. नारी शक्ती वंदन अधिनियम ही काळाची गरज आहे. हे विधेयक मंजूर झाले असते तर देशातील सर्व राज्यांच्या शक्तीत वाढ झाली असती. पण विरोधकांनी सरकारच्या प्रामाणिक प्रयत्नांची हत्या केली. ही एक भ्रृण हत्या आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

नारी शक्ती वंदन अधिनियम लागू झाले असते तर प्रत्येक राज्याचे संसदेतील प्रतिनिधित्व वाढणार होते, महिलांचे संसदेतील प्रतिनिधित्वही वाढले असते. पण काही पक्षांनी स्वतःची घराणेशाही जपण्यासाठी विधेयकाला विरोध केला. काँग्रेस तर सुधारणाविरोधी पक्ष आहे. देशाच्या प्रगतीसाठी होणारे निर्णय हाणून पाडण्यासाठीच काँग्रेस प्रयत्न करत आहेत, असा गंभीर आरोप पंतप्रधान मोदींनी केला. समाजवादी पक्ष लोहियांचे विचार विसरला आहे. त्यांना स्वतःची प्रतिमा सुधारण्याची संधी होती. पण त्या पक्षाने ही संधी गमावली, असेही पंतप्रधान म्हणाले. तृणमूल काँग्रेस आणि द्रमुकवरही त्यांनी कडाडून टीका केली.

## जिल्ह्यातील १६ कृषी सेवा केंद्राचे परवाने निलंबित

### जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** खरीप हंगाम २०२६ मध्ये शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते आणि कीटकनाशकांचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी कृषी विभागाने जिल्ह्यात धडक तपासणी मोहीम हाती घेतली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १६ कृषी सेवाकेंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा परवाना अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी शुक्रवारी दि. १७ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान ही कारवाई केली.

जिल्हाभरातील कृषी सेवा केंद्रांच्या तपासणीत अनेक घाऊक व किरकोळ खत विक्रेत्यांकडे गंभीर त्रुटी आढळून आल्या. त्यांचे खुलासे असमाधानकारक आढळल्याने व नियमांचे उल्लंघन सिद्ध झाल्याने निलंबनाची कारवाई करण्यात आली.

यामध्ये ज्ञानेश्वर कृषी सेवा केंद्र बिलोली, गजानन ॲग्रो एजन्सी हदगाव, धनश्री ट्रेडिंग कंपनी कंधार, न्यु श्रध्दा कृषी सेवा केंद्र पेठवडज ता.कंधार, माऊली कृषी सेवा केंद्र जांब ता.मुखेड, श्रीराम कृषी सेवा केंद्र बाऱ्हाळी ता.मुखेड, तिरुपती ट्रेडर्स,माळकौठा ता.मुदखेड, कैलास कृषी सेवा केंद्र मुक्रमाबाद ता.मुखेड, ज्ञानेश्वरी कृषी सेवा केंद्र मुखेड, शिल्पा कृषी सेवा केंद्र हिमायतनगर, समृध्दी बीज भांडार हिमायतनगर, बालाजी फर्टीलायझर्स कारेगाव, ता.धर्माबाद, व्यंकटेश कृषी सेवा केंद्र करडखेड, ता.देगलूर, सचिन कृषी सेवा केंद्र, माळेगाव, ता.देगलूर, श्री साई कृषी सेवा केंद्र घुंगराळा, ता.नायगाव, व्यंकटेश्वरा कृषी सेवा केंद्र बारुळ, ता.कंधार या कृषी दुकानांचा समावेश आहे.

शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून खरीप हंगामाचे नियोजन करण्यात आले आहे. निकृष्ट दर्जाच्या निविष्ठांची विक्री किंवा जादा दराने विक्री कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. नियमभंग करणाऱ्या केंद्रांवर यापुढेही कडक कारवाई केली जाईल, असे सांगितले आहे.

## नियंत्रण सुटल्याने भरधाव टेम्पो ट्रॅव्हलर घसरून दरीत कोसळला; ९ जणांचा मृत्यू

**चैन्नई (प्रतिनिधी)–** तामिळनाडूच्या वलपराई येथे झालेल्या एका रस्ते अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला आणि चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

एका हेअरपिन वळणावर टेम्पो ट्रॅव्हलरवरील नियंत्रण सुटल्याने तो घसरून दरीत कोसळला, तेव्हा हा अपघात घडला. पोलिसांच्या माहितीनुसार, हे वाहन केरळमधील पेरिंथलमन्ना येथील १३ पर्यटकांना घेऊन वलपराईहून परत येत होते. १३ व्या हेअरपिन वळणावर वाहनाचा तोल गेला आणि ते ९ व्या हेअरपिन वळणावर घसरले. या अपघातात एक पुरुष आणि आठ महिलांचा जागीच मृत्यू झाला. जखमींना रुग्णवाहिकेने वाचवून पोल्लाची येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले.

उंच पर्वतावर चढताना सरळ रस्ता शक्य नसतो. त्यामुळे, हळूहळू उंची गाठण्यासाठी रस्ता सापासारखा वळणदार बनवलेला असतो. जिथे रस्ता अचानक वळतो आणि पुन्हा समांतर दिशेत येतो, त्याला हेअरपिन वळण म्हणतात. भारतात, कोल्ली हिल्स (तामिळनाडू), सिल्क रूट (सिक्कीम), मनाली-लेह महामार्ग (हिमाचल प्रदेश) आणि नैनिताल (उत्तराखंड) येथे प्रमुख आणि लोकप्रिय हेअरपिन वळणे आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवरील एका पोस्टद्वारे या अपघातावर दुःख व्यक्त केले. त्यांनी म्हटले की, या अपघातामुळे त्यांना खूप दुःख झाले आहे आणि त्यांनी मृतांच्या कुटुंबियांप्रति शोक व्यक्त केला.

## अंमली पदार्थ व घातक शस्त्र विरोधी मोहिमेत ७३ गुन्हे दाखल; ५० लाखांचा मुद्देमल जप्त

### नांदेड परिक्षेत्रातील कारवाई




**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्रातील गुटखा, अंमली पदार्थ व घातक शस्त्र विरोधी मोहिम राबवत एका आठवडयात ७३ गुन्हे दाखल, ५० लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आगामी सण उत्सव व कायदा सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर, दि. ११ ते २५ एप्रिल, २०२६ दरम्यान, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा, अंमली पदार्थ व घातक शस्त्र विरोधी मोहिम राबविण्याचे निश्चित केले होते.


सदर मोहिमेअंतर्गत, दि. ११ ते १७ एप्रिल दरम्यान संपलेल्या पहिल्या आठवड्यात, नांदेड परिक्षेत्रात, गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहिते अंतर्गत (१२), अंमली पदार्थ विरोधी कायदयान्वये (१) व शस्त्र अधिनियम अन्वये (६०), अशा एकूण (७३) कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपींकडून ३०, ६०, ६११ रुपये किंमतीचा गुटखा व अन्य साहित्य १,१२,५५० रुपये किंमतीचा गांजा व १८, ७९, २३० रुपये किंमतीचे (३) गावठी पिस्टल, १० काडतूस, यासह तलवारी, खंजर व इतर मुद्देमाल असा एकूण ५०,५२,३९१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उपरोक्त कारवाईत, पोलीस उप महानिरीक्षक यांच्या कार्यालयातील विशेष पथकाने, परभणी ग्रामीण हद्दीत जप्त केलेल्या १३, ५८, ८०० रुपयांच्या गुटखा कारवाईचा, पोलीस ठाणे अर्धापुर हद्दीत नकली जर्दा बनविणाऱ्या कारखान्यावर केलेल्या कारवाईचा, तसेच स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी यांनी गुटखाप्रकरणी जप्त केलेल्या ८, ५६, ००० रुपयांच्या मुद्देमालाचा समावेश आहे. परिक्षेत्रात गुटखा, अंमली पदार्थ व घातक शस्त्रांच्या अनुषंगाने राबविण्यात येणारी विशेष मोहीम ही पुढील आठवड्यात आणखी व्यापकपणे राबविण्यात येणार आहे.









# अक्षयतेचा सुवर्णयोग : परंपरा, पराक्रम आणि परमार्थाचा दिवस



भगवान परशुराम हे अन्यायाविरुद्ध उभे राहणाऱ्या शक्तीचे प्रतीक मानले जातात. महात्मा बसवेश्वर यांनी समता, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाचा दीप प्रज्वलित केला. तर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य, शौर्य आणि लोककल्याण यांचे अद्वितीय आदर्श निर्माण केले.

अक्षय तृतीया हा केवळ धार्मिक सण नाही, तर तो नवीन सुरुवातीचा, सद्गुणांचा आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा दिवस आहे. या दिवशी सुवर्णखरेदी, दानधर्म, नवीन उपक्रमांची सुरुवात यांना विशेष महत्त्व आहे. पण त्याहीपलीकडे जाऊन या दिवसाचा खरा अर्थ आहे- सद्विचार आणि सत्कर्म यांची अखंड परंपरा जपणे.

आजच्या धावपळीच्या जीवनात या चारही महान प्रेरणांचा संगम आपल्याला एकच संदेश देतो; धर्म, समता, पराक्रम आणि सदाचार यांच्या मार्गाने चालल्यासच जीवन खऱ्या अर्थाने 'अक्षय' होते.

वैशाख शुद्ध तृतीया, म्हणजेच अक्षय तृतीया. हिंदू संस्कृतीत अत्यंत शुभ, पवित्र आणि चिरंतन फलदायी मानला जाणारा दिवस. 'अक्षय' म्हणजे कधीही न संपणारे. या दिवशी केलेले दान, जप, तप आणि सदाचार हे अखंड पुण्य देणारे मानले जातात.

यंदा हा दिवस अधिकच वैशिष्ट्यपूर्ण ठरतो आहे. कारण याच दिवशी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंती, भगवान परशुराम यांची जयंती, समतेचे महान विचारवंत महात्मा बसवेश्वर यांची जयंती (एकत्र) साजरी होत आहे.

**-प्रा. व्ही. व्ही. कोष्टी,**
शिपूर, जि. सांगली

# समतेचे मार्गदर्शक महात्मा बसवेश्वर

भारतीय समाजजीवनाच्या इतिहासात सामाजिक परिवर्तनाचे जे दीपस्तंभ उभे राहिले, त्यामध्ये महात्मा बसवेश्वर यांचे स्थान अत्यंत उंच व प्रेरणादायी आहे. बाराव्या शतकातील हा महान समाजसुधारक केवळ धार्मिक क्षेत्रापुरताच मर्यादित न राहता सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरांवर परिवर्तन घडवून आणणारा होता. आज साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ एक स्मरणदिन नसून त्यांच्या विचारांची पुनर्स्मृती आणि आजच्या समाजात त्यांची प्रासंगिकता अधोरेखित करण्याची संधी आहे. समता, बंधुता, श्रमाचे महत्त्व, स्त्री-पुरुष समानता आणि अंधश्रद्धाविरोध या मूल्यांचा पाया त्यांनी घातला, जो आजच्या आधुनिक लोकशाही भारताच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत आहे.

महात्मा बसवेश्वरांचा जन्म कर्नाटकात झाला. त्यांच्या बालपणापासूनच त्यांच्यातील विचारशीलता, तर्कशक्ती आणि अन्यायाविरुद्धचा विरोध स्पष्ट दिसून येत होता. त्या काळात भारतीय समाजात जातिव्यवस्था अत्यंत कडवट स्वरूपात अस्तित्वात होती. उच्च-नीचतेच्या भेदामुळे समाजात अन्याय, शोषण आणि असमानता वाढत होती. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या रूढी, परंपरा आणि कर्मकांडांनी सामान्य जनतेचे जीवन अधिकच कठीण केले होते. अशा परिस्थितीत बसवेश्वरांनी सामाजिक क्रांतीचा ध्यास घेतला आणि समाजाला नव्या विचारांची दिशा दिली.

बसवेश्वरांनी श्रम हाच सर्वोच्च धर्म आहे असे मानले. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली आणि प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तृत्वावर आधारित जीवन जगावे, असा संदेश दिला. त्यांच्या या विचारामुळे समाजातील काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सन्मान प्राप्त झाला. त्या काळात श्रमाला कनिष्ठ मानले जात असताना बसवेश्वरांनी श्रमाचे गौरवगान करून सामाजिक समतेचा पाया मजबूत केला. आजच्या काळातही 'डिग्निटी ऑफ लेबर' ही संकल्पना महत्त्वाची मानली



जाते, आणि त्याची मुळे बसवेश्वरांच्या विचारांत दिसून येतात.

बसवेश्वरांनी स्थापना केलेल्या संस्थेच्या मंचावर सर्व जाती-धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक, धार्मिक आणि नैतिक विषयांवर चर्चा करत असत. विशेष म्हणजे या मंचावर स्त्रियांनाही समान संधी देण्यात आली होती. त्या काळात स्त्रियांचे स्थान अत्यंत दुय्यम मानले जात असताना बसवेश्वरांनी त्यांना विचार मांडण्याचे स्वातंत्र्य दिले. हे त्यांच्या प्रगतिशील आणि लोकशाही विचारांचे द्योतक आहे. संस्थेमध्ये केवळ धार्मिक चर्चा होत नसून सामाजिक समस्यांवरही उपाय शोधले जात होते, ज्यामुळे समाजात परिवर्तन घडून आले.

बसवेश्वरांनी जातिव्यवस्थेला तीव्र विरोध केला. त्यांनी सांगितले की, माणसाची ओळख त्याच्या जन्मावरून नव्हे तर त्याच्या कमविरून ठरते. त्यांनी सर्वांना समान मानले आणि समाजात भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विचारांमुळे अनेकांनी जातीभेदाचा त्याग करून समतेच्या मार्गाचा स्वीकार केला. त्यांनी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले, जे त्या काळात अत्यंत क्रांतिकारी पाऊल होते. यामुळे समाजात मोठी खळबळ उडाली, परंतु त्यांनी आपल्या विचारांशी तडजोड केली नाही.

स्त्री-पुरुष समानतेबाबत बसवेश्वरांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य आणि समान अधिकार देण्यावर भर दिला. त्यांनी स्त्रियांच्या सहभागाला प्रोत्साहन देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. त्या काळात स्त्रियांना अनेक बंधनांमध्ये ठेवले जात असताना बसवेश्वरांनी त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता दिली. त्यांच्या या विचारांमुळे समाजात स्त्रियांच्या स्थानात सकारात्मक बदल घडून आला.

बसवेश्वरांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि बाह्य अवडंबर यांचा तीव्र निषेध केला. त्यांनी साधेपणावर भर दिला आणि अंतर्मुख भक्तीची संकल्पना मांडली. त्यांच्या वचनांमधून त्यांनी लोकांना सत्य, नैतिकता आणि साधेपणाचा मार्ग दाखवला. त्यांनी देवाची उपासना ही मनापासून करावी, असे सांगितले आणि बाह्य विधींचा त्याग करण्याचे आवाहन केले. त्यांच्या या विचारांमुळे धर्माचा खरा अर्थ लोकांना समजला.

बसवेश्वरांच्या वचनांमध्ये समाजातील वास्तवाचे चित्रण दिसून येते. त्यांच्या वचनांमध्ये जीवनातील अनुभव, तत्त्वज्ञान आणि सामाजिक संदेश यांचा समन्वय आहे. त्यांनी सोप्या भाषेत आणि प्रभावी शैलीत आपले विचार मांडले, ज्यामुळे ते सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले. त्यांच्या वचनांमधून त्यांनी समाजातील अन्याय, विषमता आणि अज्ञान यावर प्रहार केला आणि लोकांना जागृत केले.

आज महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करणे आवश्यक आहे. केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता त्यांच्या विचारांचा अंगीकार करणे गरजेचे आहे. समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांवर आधारित समाजरचना निर्माण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

समाजात बदल घडवून आणण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी विचारांमध्ये परिवर्तन आवश्यक असते. बसवेश्वरांनी हेच कार्य केले. त्यांनी लोकांच्या विचारांमध्ये बदल घडवून आणला आणि समाजाला नव्या दिशेने नेले. आजच्या काळातही त्यांच्या विचारांची गरज आहे, कारण सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी मूल्याधिष्ठित दृष्टिकोन आवश्यक आहे.

महात्मा बसवेश्वर हे केवळ एक संत नव्हते, तर ते एक महान समाजशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारक होते. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करून सर्वसमावेशक विकासाचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांमध्ये मानवतावाद, समता आणि न्याय यांचा समन्वय आहे. त्यामुळे त्यांचे विचार आजही तितकेच प्रभावी आणि प्रेरणादायी आहेत. अखेरीस असे म्हणता येईल की, महात्मा बसवेश्वरांचे कार्य आणि विचार हे भारतीय समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा अभ्यास करून त्यांचा अंगीकार केला, तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. समतेवर आधारित, न्यायपूर्ण आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती करण्यासाठी बसवेश्वरांचे विचार मार्गदर्शक ठरतील. त्यांच्या कार्याची आणि विचारांची प्रेरणा घेऊन आपण एक समताधिष्ठित, मानवतावादी आणि प्रगत समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहूया, हेच त्यांच्या जयंतीनिमित्त खरे अभिवादन ठरेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# आध्यात्मिक लोकशाहीचे जनक महात्मा बसवेश्वर

सामाजिक समतेचा ध्यास मनाशी बाळगून, तत्त्वांशी, विचारांशी एकरूप राहून, सामाजिक समतेचा झेंडा घेऊन धर्माचा खरा अर्थ आणि मार्ग सांगणाऱ्या महान विभूतींमध्ये महावीर, दयानंद, राममोहन रॉय, रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद अशा भिन्न मतावलंबी सामाजिक सुधारकांचा समावेश होतो. या श्रेणीत थोर समाजसुधारक समतावादी महात्मा बसवेश्वर यांचे स्थान महत्त्वाचे आहे.

श्रीमद् भगवद्गीतेत श्रीकृष्णाने म्हटले आहे की, धर्म विनाशाच्या मार्गाने जाऊ लागतो आणि विवेकहीन अंध विश्वाची चलती होऊ लागते तेव्हा मी परमेश्वर सत्याच्या उद्धारासाठी अवतार घेऊन त्याची प्रचिती हिंदू धर्माच्या तत्वज्ञानात आणि ऐतिहासिक दृष्टांतातून मिळते. वेगवेगळ्या काळात असे सत्यशोधन करून धर्माचा खरा अर्थ सांगणाऱ्या महान विभूतींमध्ये म. बस्वेश्वरांचे स्थान आहे. सामाजिक समतेचा महामेरू म. बस्वेश्वर म्हटल्यास गैर ठरणार नाही.

### बसव संदेश सामाजिक समता

महात्मा बसवेश्वरांनी ज्या धर्माचा उपदेश केला तो मूलतः सामाजिक स्वरूपाचा होता. त्यांनी आपल्या काळात ब्राह्मणवादाचा विरोध केला. तत्कालीन ब्राह्मण धर्म विशिष्ट योग्यतेची मागणी व भलावण करीत होता. बसवेश्वरांनी ईश्वर भक्तीचे महत्त्व आणि सर्व प्राणीमात्रांना प्रेम भावनांची उद्घोषणा केली.

महात्मा बसवेश्वरांनी वैदिक धर्मातील जाती व्यवस्थेविरुद्ध व अन्य हानिकारक प्रथाविरुद्ध संघर्ष केला. त्यांनी निर्गुण, निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार केला. बसवेश्वरांनी घालून दिलेल्या मार्गाला लिंगायत धर्म या नावाने ओळखले जाते. सर्वधर्मसमभाव जोपासणाऱ्या बसवेश्वरांनी १२ व्या शतकात सर्व कनिष्ठ व उच्च जातीतील लोकांना लिंगायत समाजात प्रवेश दिला. कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी येथे महात्मा बसवेश्वर यांचा जन्म झाला. ११०५ ते ११६७ बसवेश्वरांचा जीवनकाळ आहे. वैशाख शुद्ध तृतीया म्हणजे अक्षय तृतीया हा त्यांचा जन्मदिवस आहे. नंदीचे रूप म्हणून त्यांचे नाव वृषभ ठेवण्यात आले नंतर बसव व बसवेश्वर असे नामकरण झाले.

बसवेश्वरांनी आठव्या वर्षी उपनयन (मुंज) करण्याचे नाकारले. घराचा त्याग केला. कुंडल संगम येथे जाऊन ते जात वेध मुनीकडे राहू लागले. कर्नाटकात कृष्णा व मलप्रभा नद्यांच्या संगमवर हे शिवमंदिर होते. संगमेश्वरावर बसवेश्वरांची श्रद्धा होती. तेथेच त्यांनी जात वेध मुलीकडून लिंगायत समाजाची दीक्षा घेतली. येथे वेद अभ्यास अनेक धार्मिक ग्रंथाचे अध्ययन, चिंतन, मनन बसवेश्वरांनी केले. तत्कालीन समाजातील लोकांचे कर्मकांड व अंधविश्वास पाहून त्यांचे मन त्यांना स्वस्त बसू देईना. ते वैदिक परंपरा विरोधी होते.

### अध्यात्मिक लोकशाहीचा विचार

अध्यात्मिक लोकशाहीचा विचार म. बसवेश्वरांनी १२ व्या शतकात मांडला व समाजात असलेली मरगळ



दूर करण्यासाठी त्यांनी त्याकाळी सामाजिक क्रांतीची बीजे पेरली. लिंगायत समाजाबरोबर हिंदू धर्मातील शूद्र जातीच्या लोकांना देखील अहिंसेच्या मार्गावर आणण्यासाठी त्यांनी वीरशैव धर्माची दीक्षा देऊन जातीपातीची बंधने झुगारून लावली.

स्त्री-पुरुषांना समान हक्काची शिकवण महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात दिली. जातीयवाद त्यांना कदापी मान्य नव्हता. स्त्रियांना देखील समान हक्क मिळावा यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांनी सनातन धर्मातील सर्व प्रतिबंधित शास्त्रविधींना तिलांजली दिली. पुरोहितांचे वर्चस्व व त्यांच्या सिद्धांतापासून सर्वसामान्य स्त्री-पुरुषांना त्यांनी मुक्ती मिळवून दिली. उच्च निश्चतेच्या कल्पनांना मूठमाती देऊन आपल्या अनुयायात समानतेची भावना दृढमूल केली. त्यांनी महिला वर्गाच्या मदतीसाठी संघर्ष केला. दलित व मागासवर्गीय लोकांबरोबर उच्च वर्णीयांप्रमाणे समानतापूर्वक व्यवहार केला. बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचा मूळ गाभा सामाजिक समता होता.

महात्मा बसवेश्वरांनी संस्कृत भाषेतील सुरक्षित ज्ञानाच्या एकाधिकाराला आव्हान दिले व ते तोडले. आपल्या विचारांना सामान्यांच्या घरापर्यंत बोलीभाषेत पोहोचविले. उपनिषद काळातील हिंदुत्वज्ञान आणि आचार-विचारांच्या प्राचीन वैभवास बळ देण्याचे काम त्यांनी केले आणि म्हणूनच बसवेश्वरांना परमेश्वराचा अवतार मानतात. गौतम बुद्धाप्रमाणेच बसव संदेशात भक्तीपुरण प्रेम आणि विद्या समाविष्ट होती. त्यात स्त्री-पुरुषांना समान दृष्टीने पाहण्याचा उपदेश आहे आणि मानव मात्रात भेदभाव करण्यास अजिबात स्थान नाही. बसवकाळातील सामाजिक, आर्थिक सिद्धांत व धार्मिक चिंतनावर त्यांचा विचारांचा क्रांतिकारी प्रभाव पडलेला होता.

### पाखंडी विद्रोही

महात्मा बसवेश्वरांनी संस्कृत भाषेतील सुरक्षित ज्ञानाच्या एकाधिकाराला आव्हान दिले व ते तोडले आपल्या विचारांना सामान्यांच्या घरापर्यंत बोली भाषेत पोहोचविले.

उपनिषद काळात हिंदू तत्त्वज्ञान आणि आचार-विचाराच्या प्राचीन वैभवास बळ देण्याचे त्यांनी काम केले आणि म्हणूनच बसवेश्वरांना परमेश्वराचे अवतार मानतात. महात्मा बुद्धाप्रमाणेच बसव संदेशात भक्तीपूर्ण प्रेम आणि विद्या समाविष्ट होती. त्यात स्त्री-पुरुषांना समान दृष्टीने पाहण्याचा उपदेश आहे. मानव मात्र भेदभाव करण्यास अजिबात स्थान नाही. बसवकाळातील सामाजिक, आर्थिक सिद्धांत व धार्मिक चिंतनावर त्यांच्या विचारांचा क्रांतिकारी प्रभाव पडलेला होता.

### श्रमाची प्रतिष्ठा

बसवेश्वर यांनी सांगितले की, तुम्ही काम करण्यासाठी तयार व्हावं शेतात जा, एरवी फळे मिळणार नाहीत. बसव, तत्वानुसार त्यांची शिकवण अशी जीवन यथार्थ आहे. जीवन सत्य आहे आणि समाधी हे त्याचे लक्षण नाही त्यांनी सांगितले की, अनुयायांनी जीवनाची आव्हाने धैर्याने आणि दृढतेने, निर्धाराने पेलली पाहिजेत. त्यांचा हिमतीने मुकाबला केला पाहिजे. त्यांनी कायक या तत्त्वाचे महत्त्व समजावून सांगितले. श्रमाची प्रतिष्ठा सांगणारा हा क्रांतिकारी संदेश होय.

बसवेश्वर यांनी समाज परिवर्तनासाठी आयुष्यभर कार्य केले जे जे करणे शक्य होते ते ते त्यांनी केले. कशाची पर्वा न करता केवळ समाजहितासाठी त्यांनी कार्य केले. त्यापेक्षा आता आपल्या हातून काही कार्य होईल असे वाटत नाही असे त्यांना वाटते आणि ११६७ साली म्हणजे वयाच्या ३६ व्या वर्षी त्यांनी निश्चयपूर्वक देह ठेवला. ते शिवमय होऊन गेले. समाजाला योग्य वळण लावणारा महात्मा आजही क्रांतिकारक वाटतो. त्यांचे विचार आजही आमच्या पिढीला मार्गदर्शक ठरतात.

**-उमाकांत गोपछडे**
माजी उपसभापती
पंचायत समिती, बिलोली

## करू नको अहंकार...

जगी नाम होण्यासाठी
आधी तपावे लागते ।
अरे चंदनासमान
नित्य झिजावे लागते ।।
आयत्याला कुठे इथे
गोड लागते भाकरी ।
त्यांना भोगावे लागते
फक्त दुःख नानापरी ।।
हिनवून दुबळ्यांना
तुझी लायकी दावतो ।
अरे कशाला माणसा
पशु समान जगतो? ।।
तुज मरण येईल
तेंव्हा मातीच होशील ।
देह मातीचा पुतळा
किती काळ टिकशील? ।।
प्रेमरूपी मद्यप्याला
जरा तुझ्या ओठी लाव ।
मदतीला गरिबांच्या
मनोभावे नित्य धाव ।।
जग सद्भावे माणसा
करू नको अहंकार ।
जन्म देणाऱ्यांचे कधी
भुलू नको उपकार ।।

**-अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी ता.दारव्हा, जि.यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

## शेतकरी उभा बांधावर

वादळ-वारा, ऊन-पाऊस
झेलीत अंगावर
काळ्या आईची ओटी भराया
शेतकरी उभा बांधावर
मिरचीचा ठेचा
चतकोर भाकरीवर
ठिगळाचं धोतर
घालीतो अंगावर
शेतकरी उभा बांधावर
अनवाणी पायाला
घाबरतो जनावर
मैत्रीचा हात देऊन
वावरतो शेतावर
शेतकरी उभा बांधावर
अगणित घटे
त्याच्या हातावर
वेदना कसली
त्या उमलत्या कळीवर
शेतकरी उभा बांधावर
वंदीत राहो सदा
तुझे उपचार
अभिमानाने देश उभा
तुझ्या कर्तृत्त्वावर
शेतकरी उभा बांधावर.

**-गोविंद कवळे**
इळेगाव(गं. प.) पो. बोळसा, ता. उमरी
जि. नांदेड
मो. ७३८७२६७२१९

# महिला सक्षमीकरण विकासाच्या दिशेने पुढचे पाऊल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मी कोणत्याही समाजाची प्रगती त्या समाजातील महिलांनी केलेल्या प्रगतीवरून मोजतो (I measure the progress of a community by the degree of progress which women have achieved) हे जागतिक कीर्तीचे विधान केले होते. २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय दलित महिला परिषदेत (ll India Depressed Classes Women's Conference) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात हे उद्गार काढले होते. आज २०२६ या वर्षातही या क्रांतीकारी वाक्याच्या सत्यतेची आपल्याला पदोपदी अनुभूती येत आहे.

भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून भारतीय महिलांना शिक्षित होण्याची, आर्थिक संपन्न होण्याची, संघटित होण्याची आणि आत्मसन्मानाने जगण्याचा हक्क दिलेला आहे. यामाध्यमातून महिलांनी शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा, राजकारण आणि उद्योग या सर्व क्षेत्रांमध्ये आपली छाप उमटवली आहे. महिलांनी विविध क्षेत्रात त्यांच्या कतृत्वाचा ठसा उमटविला आहे.

तरी आजही महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, जसे



की लिंगभेद, अत्याचार, बालविवाह, आणि शिक्षणातील असमानता. या समस्यांवर मात करण्यासाठी सरकार, समाज आणि प्रत्येक व्यक्तीने एकत्र येऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे. महिलांनी आपल्या हक्कांबद्दल जागरूक होणे, आर्थिक स्वावलंबी होऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहणे आवश्यक आहे. त्यामुळे महिला या समाजात सन्मानाने जीवन जगू शकतात.

ज्या समाजात महिलांना समान हक्क, संधी आणि सन्मान मिळतो तो समाज अधिक विकसित आणि सुसंस्कृत मानला जातो. महिला सक्षम झाली तरच कुटुंब, समाज परिणामी देश अधिक सक्षम होण्यास मदत होते. महाराष्ट्र शासनाने वेळोवळी महिलांसाठी विविध योजना प्रत्यक्ष अंमलात आणून महिला सक्षमीकरणच्या माध्यमातून राज्याच्या विकासासाठी पाऊल टाकले आहे.

नारी शक्ती ही केवळ एक संकल्पना नसून ती समाजाच्या प्रगतीचा मुख्य आधार आहे. यासाठी शासन मुलींच्या जन्मापासून ते वृध्द /निराधार महिलांच्या मदतीसाठी विविध विभागांमार्फत विविध योजनांची अमंलबजावणी करीत आहे. यामध्ये महिला आणि बालविकास विभागामार्फत महिला सक्षमीकरण, आरोग्य आणि बाल कल्याणासाठी अनेक योजना राबवल्या जातात. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' पात्र महिलांना आर्थिक सहाय्य (मासिक १५००रू.), 'सुकन्या योजना' मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी आणि बालविवाह रोखण्यासाठी या योजनेत मुलींच्या नावे ५० हजार रूपयांची मुदत ठेव(FD) केली जाते., 'एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS)' या योजनेत ० ते ६ वर्षे वयोगटातील मुले, गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना पोषण आहार, लसीकरण व आरोग्य तपासणी, 'मिशन वात्सल्य' या योजनेत अनाथ बालके, बेघर मुले आणि संकटात सापडलेल्या बालकांचे संरक्षण व पुनर्वसन करण्यात येते, आणि 'वन स्टॉप सेंटर' (सखी केंद्र) हिंसाचारग्रस्त महिलांना पोलीस मदत, वैद्यकीय साहाय्य, कायदेशीर सल्ला आणि तात्पुरता निवारा एकाच छताखाली मिळवून देणे. किशोरी शक्ती योजना (किशोरवयीन मुलींचे आरोग्य, पोषण आणि शिक्षणासाठी), महिला किसान योजना (महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी), महिला आर्थिक विकास महामंडळ (महिलांना स्वयंरोजगारासाठी अनुदान आणि कर्ज सुविधा) यांचा समावेश आहे. या विविध योजनांद्वारे आर्थिक साहाय्य, पोषण, शिक्षण आणि संरक्षण पुरवले जाते.

'बेटी बचाओ, बेटी पढाओ' मोहिमेअंतर्गत सुकन्या समृध्दी योजना सुकन्या समृद्धी योजना (SSY) ही भारत सरकारची मुलींच्या शिक्षण आणि लग्नासाठी (शिक्षण व विवाहास मदत) अल्प बचत योजना आहे. मनोधैर्य योजना (अत्याचारित महिला व बालकांना कायदेशीर व आर्थिक मदत). कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाद्वारे महिलांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना आर्थिक पाठबळ देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप ही महत्त्वपूर्ण योजना राबवली जाते. अशा प्रकारे विविध योजना शासन राबवित आहे.

महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजना म्हणजे महिलांना त्यांच्या जीवनातील स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी, त्यांना स्वतः चे निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे होय. त्यामुळे महिला सक्षमीकरण हे केवळ महिलांसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. नारीशक्ती हीच खरी राष्ट्रशक्ती आहे. महिलांना सशक्त करणे म्हणजे खऱ्या अर्थाने देशाचा सर्वांगीण विकास करणे होय.

**-रेखा पालवे-गायकवाड**
उपसंपादक
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

# एकल महिलांसाठी कार्यवाही संवेदनशीलतेने पार पाडा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीची बैठक संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत विधवा व घटस्फोटीत (एकल) महिलांसाठी आवश्यक असलेली सर्व कार्यवाही अत्यंत संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रशांत थोरात, साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी तसेच महिला व बाल विकास विभाग, माविम, उमेद, जिल्हा कौशल्य विकास विभाग आदींचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने १ मे रोजी विशेष ग्रामसभा आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले. या ग्रामसभांमध्ये अंगणवाडी सेविकांनी केलेल्या सर्वेक्षणातील एकल महिलांची यादी सादर करून त्यांच्या गरजा, समस्या व आवश्यक कागदपत्रांबाबत तत्काळ कार्यवाही करण्याचे सांगण्यात आले. तसेच ग्रामपातळीवर एकल महिलांची अचूक संख्या निश्चित करून त्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्याबाबतही ग्रामसभेत चर्चा करण्याचे निर्देश देण्यात आले. संबंधित अहवाल तालुकास्तरीय मिशन वात्सल्य समितीकडे सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

एकल महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात माविम व उमेद अभियानाच्या माध्यमातून मेळावे व प्रेरणा कार्यशाळा आयोजित करण्यावर भर देण्यात यावा, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, जिल्हा महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन' योजनेचा लाभ जास्तीत जास्त गरजू बालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शाळांमार्फत अर्ज मागविण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त शाळांमध्ये एकल पालक असलेल्या बालकांचे सर्वेक्षण करून पात्र लाभार्थ्यांचे अर्ज तयार करून तालुकास्तरीय संरक्षण अधिकाऱ्यांकडे सादर करावेत, असेही सांगण्यात आले.

एकल महिलांकडे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्यास ती पहिल्या टप्प्यात १५ दिवसांच्या आत उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. यामध्ये आधार कार्ड, उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, पतीचा मृत्यू दाखला, जॉब कार्ड आदी कागदपत्रांचा समावेश असून, ग्रामविकास विभागाने तहसीलदार व बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या समन्वयातून यासाठी तातडीने कार्यवाही करावी, असेही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले.

# नांदेड जिल्ह्यात १०६७ रुग्णांना सुमारे ८.२१ कोटींची मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती




**नांदेड (प्रतिनिधी) –** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. नांदेड जिल्ह्यात आर्थिक वर्षात १०६७ रुग्णांना सुमारे ८ कोटी २१ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रुग्णालय, धर्मादाय रुग्णालय, संस्था, दाते आदींचे सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत नांदेड जिल्ह्यातील १०६७ रुग्णांना सुमारे ०८ कोटी २१ लाख ११ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या जिल्हा कक्ष, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, सामंजस्य करार आदींमुळे रुग्णांना वेळेत अर्थसहाय्य होत आहे. गरजू रूग्णांनी योजनेचा लाभ घेण्याकरिता आणि अधिक माहितीकरिता १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# रस्ता दुरुस्तीसाठी बोरगाव तेलंग येथे शेतकऱ्यांचे उपोषण



**नांदेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील लिंबगाव जिल्हा परिषद सर्कलमधील विविध रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी बोरगाव (तेलंग) येथील शेतकरी संतोष क्षीरसागर हे बोरगाव पाटी येथे बेमुदत उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या उपोषणाला या भागातील अनेक शेतकऱ्यांनी, माजी लोकप्रतिनिधींनी पाठिंबा दिला आहे.

रस्ते दुरुस्तीसाठी त्यांनी शासनाकडे आणि संबंधित लोकप्रतिनिधीकडे वारंवार लेखी आणि तोंडी स्वरूपात निवेदन देऊनही मागील दोन वर्षांपासून कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे लोकाग्रहास्तव लोकशाही मार्गाने संबंधित न्यायिक मार्गाने मागण्या मान्य करून घेण्यासाठी दि. १७ एप्रिलपासून सकाळी ९ वाजता बेमुदत उपोषणास बसले आहेत.

नसरतपूर ते वाघी सिमेंट रस्त्यावरील मोठमोठ्या पडलेल्या भेगा आणि रस्त्याच्या दुतफा वाढलेली बाभळीची झाडे तोडून योग्य पिचिंग करणे.

वाघी ते नाळेश्वर सिमेंट रस्ता अर्धवट आणि अतिशय निकृष्ट झाला आहे त्याची चौकशी करून रस्त्याचे काम जलद गतीने पूर्ण करून देणे, हसापूर ते नसरतपूर रस्त्यावर कंबरमोड खड्डे पडले आहेत. हा रस्ता सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी जलद गतीने तयार करून देण्यात यावा, बोरगाव फाटा ते बोरगाव (तेलंग) रोड मागील दोन वर्षापासून अर्धवट अवस्थेत आहे हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, तळणी फाटा ते धानोरा रस्त्याची अतिशय वाईट परिस्थिती आहे. ह्या रस्त्याचे काम पूर्ण करून द्यावे आदी मागण्यांसाठी त्यांनी उपोषण सुरू केले असून त्यांच्या उपोषणाला परिसरातील शेतकऱ्यांनी, माजी लोकप्रतिनिधींनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला आहे. उपोषणकर्त्यांच्या मागण्या तातडीने निकाली काढाव्यात व नादुरुस्त रस्ते तत्काळ दुरुस्त करावे अन्यथा आंदोलन करण्यात येणार असल्याचे क्षीरसागर यांनी सांगितले.

# युवकांसाठी किनवट येथे शिका आणि कमवा अंतर्गत २३ एप्रिल रोजी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी) –** बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट व आदिवासी उमेदवारांकरिता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, माहिती व मार्गदर्शन केंद्र किनवट जि. नांदेड यांच्या संयुक्त विद्यमानाने टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रा.लि. कंपनीमार्फत तरुणांसाठी टोयोटाचा शिका आणि कमवा अंतर्गत कौशल्य विकास उपक्रम प्लेसमेंट ड्राईव्ह २३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता बळीराम पाटील महाविद्यालय किनवट येथे आयोजीत केले आहे.

युवकांना तांत्रिक शिक्षणासोबत रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी टोयोटा किर्लोस्कर मोटार प्रा.लि.यांनी तरुणांसाठी टोयोटाचा शिका आणि कमवा अंतर्गत कौशल्य विकास उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यांचा कौशल्य विकासावर विशेष भर दिला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

# नांदेड तालुक्यातील विकासकामांचा दोन्ही आमदारांनी घेतला आढावा



**नांदेड (प्रतिनिधी) –** नांदेड तालुक्यातील शासकीय कामे तत्काळ निकाली काढण्यासाठी नांदेड उत्तर विधानसभा मतदारनसंघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर व नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव तिडके बोंढारकर यांच्या अध्यक्षेखाली तालुक्यातील सर्व तालुकास्तरीय अधिकारी, तालुका कार्यालय प्रमुख विभाग यांचा महत्वाच्या विषयावर आढावा घेतला व अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिल्या.

विशेषतः मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते, अन्न नागरी पुरवठा, सामाजिक सुरक्षा योजना, पाणी टंचाई, वीज पुरवठा, कृषीविषयक बाबी, खत, बी-बियाणे पुरवठा, छत्रपती शिवाजी महाराज महाराज्यस्व शिबीर अभियान, नैसर्गिक आपत्ती अनुदान, विशेष सहाय्य अनुदान वाटप, ई फेरफार, जलजीवन पाणीपुरवठा, महावितरण, कायदा व सुव्यवस्था आदी विषयांवर आढावा घेतला. दोन्ही आमदार महोदयांनी उपस्थित अधिकाऱ्यांना चांगले व व्यवस्थित काम करण्याची सूचना दिली.

या बैठकीस उप विभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, नांदेडचे तहसीलदार संजय वारकड, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, उपअधिक्षक भूमिअभिलेख, मृद व जलसंधारण, तालुका कृषी अधिकारी, पूर्णा पाटबंधारे, ग्रामीण पाणी पुरवठा, गट शिक्षण अधिकारी, पोलीस निरीक्षक शिवाजीनगर, लिंबगाव, नांदेड ग्रामीण, इतवारा, विमानतळ, नायब तहसीलदार सुनिल माचेवाड, संजय नागमवाड, नितिशकुमार, इंद्रजित गरड व तालुक्यातील लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# नरसी सोसायटीचा एकमताने निर्णय; श्रावण पाटील भिलवंडे यांना मतदानाचा अधिकार



**नायगाव (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नरसी सेवा सहकारी सोसायटीने घेतलेला निर्णय लक्षवेधी ठरला आहे. सोसायटीच्या विशेष सभेत भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते श्रावण पाटील भिलवंडे यांना मतदानाचा अधिकार बहाल करण्याचा ठराव बिनविरोध मंजूर करण्यात आला आहे.

नायगाव तालुक्यातील नरसी येथील सोसायटीच्या सभागृहात दि. १५ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता चेअरमन गजानन पांडुरंग भिलवंडे यांच्या अध्यक्षतेखाली ही विशेष सभा पार पडली. आवश्यक कोरम पूर्ण झाल्यानंतर सभेला सुरुवात झाली. प्रारंभी काही नियमित विषयांवरील ठराव मंजूर करण्यात आले.

या सभेत सदस्य पांडुरंग नागेश्वर यांनी नांदेड जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी मतदानाचा अधिकार श्रावण शंकरराव भिलवंडे यांना देण्याचा ठराव सभेपुढे मांडला. या प्रस्तावाला उपस्थित बहुसंख्य सदस्यांनी एकमताने पाठिंबा दर्शवत हा ठराव हात उंच करून बिनविरोध मंजूर केला.

या ठरावास पांडुरंग जळबा नागेश्वर यांनी सूचक म्हणून प्रस्तावित केले, तर मारोती रामचंद्र बुक्के यांनी अनुमोदन देत पाठिंबा नोंदविला.

# म. फुले व डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त जिल्हा परिषद शाळेत महामानवांची पुस्तके वाटप



**नांदेड (प्रतिनिधी) –** राष्ट्रपिता महात्मा जोतीबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्ताने कौठा येथील जिल्हा परिषद शाळेत पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना महामानव महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांचे आचार-विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत व त्यांच्या डोक्यात सर्व महामानवांचे विचार रुजले जावेत. म्हणून अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद नांदेड शहर शाखेच्या वतीने महापुरुषांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शालेय वयातच महापुरुषांचे विचार कळावेत आणि त्यांच्या जीवनातून काहीतरी सकारात्मक शिकायला मिळावे, या उदात्त हेतूने महात्मा फुले समता परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. संघरत्न गायकवाड व जिल्हा शाखेच्या वतीने एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला आहे. कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास महात्मा फुले समता परिषदेचे नांदेड ग्रामीण जिल्हाध्यक्ष नारायण अंबुरे, नांदेड जिल्हा शहर अध्यक्ष ॲड. संघरत्न गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल पाटील धमने, शहर उपाध्यक्ष शुद्धोधन ढवळे, जिल्हा सचिव रवी बहादूरे, जिल्हा सरचिटणीस अनिल गायकवाड, ॲड. सुरेश कांबळे, सटवाजी भिसे, राहुल कसबे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शाळेतील मुख्याध्यापक बड्डु, ठाकूर, आडेपवार, सौ. चिलवंलवार, हाके आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खुरगाव येथे फुले-आंबेडकर संयुक्त जयंती सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील खुरगाव-नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात रविवार, दि. १९ एप्रिल रोजी म. जोतीराव फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

निर्वाणपदस्थ भदंत जीनरत्न महाथेरो यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विविध कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे. तसेच विपश्यनाचार्य भदंत पंय्यारत्न थेरो यांची धम्म देसना आणि श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित थायलंड धम्म पर्यटनावरुन परतलेल्या सर्व बौद्ध उपासक-उपासकांचा सत्कार होणार असल्याची माहिती श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी दिली.

खुरगाव-नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात दरमहा पौर्णिमेच्या औचित्याने १९ तारखेला पौर्णिमोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमात परित्राणपाठ, बोधीपूजा, त्रिरत्न वंदना, ध्यान आनापान, धम्मदेसना होणार आहे. तेव्हा संबंधितांनी शुभ्र वस्त्र परिधान करून कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

# संत गोरोबाकाका यांच्या स्मृत्यर्थ आयोजित कीर्तन सोहळ्याला भाविकांचा प्रतिसाद



**लोहा (प्रतिनिधी)–** येथील आबादानी परिसरात संत शिरोमणी गोरोबाकाका यांच्या पुण्यतिथीनिमित्त कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थितांनी संत गोरोबा काका यांच्या स्मृतीस अभिवादन केले. कीर्तनाच्या कार्यक्रमाला भाविकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

याप्रसंगी हभप आत्माराम महाराज रायवाडीकर यांच्या रसाळ वाणीतून व कीर्तनाच्या उपदेशातून समाज परिवर्तनाची दिशा मांडण्यासाठी गोरोबा काका यांचे महत्त्व सांगितले. हातातील थापटीने केवळ मडक्यांनाच नव्हे तर समाजाच्या मनातील योग आकार देण्याचे महान कार्य त्यांनी केले. भक्ती आणि कर्म यांचा सुंदर संगम साधत निर्गुण निराकार ईश्वरासी एकरूप होण्याचा मार्ग गोरोबाकाकांनी आपल्या अभंगातून जगाला दाखवून दिला. संत गोरोबा काकांचे विचार आपल्या सर्वांसाठी सदैव प्रेरणादायी ठरत राहतील, असे सांगून उपस्थित भाविक भक्तांना मंत्रमुक्त केले.

यावेळी माजी आमदार रोहिदास चव्हाण, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीमभाई शेख, नगरसेवक विलास काहाळेकर, मारोतराव दांगटे, पिराजी जोरूळे, भगवानराव सोनवणे, राजू जोरुळे, अंकुश जोरुळे, सटवा शेटे, संजय शेटे, नागेश शेवडकर, राधाकृष्ण जोरुळे, शिवराज दाढेल आदींसह समाजातील महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन -डॉ. शेखर घुंगरवार



**नांदेड (प्रतिनिधी)–** शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य शेखर घुंगरवार यांनी केले. श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयातील यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला समितीच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. १५ एप्रिल रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य घुंगरवार बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे होते तर प्रमुख वक्ते म्हणून वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांची उपस्थिती होती. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे, डॉ. हरिश्चंद्र पतंगे आणि व्याख्यानमाला समन्वयक डॉ. संदीप पाईकराव यांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविकात डॉ. संदीप पाईकराव यांनी व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमांतून प्रेरणा घेऊन समाजाभिमुख दृष्टीकोन विकसित करावा, असे आवाहन केले.

प्रमुख वक्ते डॉ. शेखर घुंगरवार यांनी, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार आणि योगदान' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण, सखोल आणि प्रेरणादायी व्याख्यान दिले. त्यांनी सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा उल्लेख करून प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी शिक्षणाच्या बळावर कसा इतिहास घडविला, हे प्रभावीपणे मांडले.

ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नव्हते, तर ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम होते. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना सशक्त करण्याचे कार्य केले. शिक्षण हे स्वातंत्र्याचे शस्त्र आहे, या विचारावर त्यांनी विशेष भर दिला. समाजातील विषमता, अस्पृश्यता आणि अन्याय दूर करण्यासाठी शिक्षणाची भूमिका किती महत्त्वाची आहे, याचे त्यांनी विविध उदाहरणांद्वारे स्पष्टीकरण दिले.

डॉ. घुंगरवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक दृष्टिकोनाचे विविध पैलू उलगडताना सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ उच्च शिक्षण घेतले नाही, तर शिक्षणव्यवस्थेतील बदलांसाठीही प्रयत्न केले. त्यांनी स्त्री शिक्षण, सर्व-समावेशक शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांना प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता व्यापक वाचन, चिंतन आणि अभ्यास करण्याची सवय लावावी, असे त्यांनी सुचविले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी अत्यंत चिंतनशील व मार्गदर्शक विचार मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेताना शिक्षण, समता आणि मानवतेच्या मूल्यांवर विशेष भर दिला. आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी केवळ करिअरकडे न पाहता समाजातील प्रश्न समजून घेण्याची आणि त्यावर उपाय शोधण्याची जाणीव ठेवली पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी सूत्रसंचालन डॉ. मीरा फड यांनी केले तर आभार डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड यांनी मानले.

# चंदेरी

## अक्षय कुमारचा मुलगा करतो काय? महिन्याला कमावतो...

**बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमार गेल्या दोन दशकांहून अधिक काळ आपल्या चित्रपटांच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. 'खिलाडी', 'मोहरा', 'हेरा फेरी', 'फिर हेरा फेरी', 'भुलभुलैया', 'स्पेशल २६', 'बेबी', 'पॅडमॅन', 'टॉयलेट : एक प्रेम कथा', 'मिशन मंगल' यांसह अनेक चित्रपटांमधून तो प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. अभिनेत्याची पत्नी आणि लेखिका ट्विंकल खन्ना हीदेखील लोकप्रिय अभिनेत्री होती. सध्या ती इंडस्ट्रीपासून लांब आहे. मात्र, अक्षय अन् ट्विंकल यांचा मुलगा आरव चित्रपटसृष्टीत सक्रीय नाहीय. त्याला या क्षेत्रात काही रस नसून तो एका वेगळ्या क्षेत्रात आपलं करिअर करत आहे. याबद्दल अक्षयने स्वतःच नुकत्याच एका मुलाखतीत सांगितले आहे.**



अक्षयने सांगितले की, आमच्या दोघांमध्ये खूप साम्य आहे. त्यालाही माझ्याप्रमाणेच फिट राहण्याची आवड आहे. तो खूप मेहनती मुलगा आहे. त्याची या इंडस्ट्रीत यायची अजिबात इच्छा नाही. त्याचा तसा कोणताही विचार सध्या तरी नाही. त्याला फॅशन इंडस्ट्रीत आपले नाव कमवायचे आहे. आरव सध्या फॅशनचे बारकावे शिकत असल्याचे अक्षयने सांगितले. तो म्हणाला, की आरव आजही ४,५०० रुपयांची नोकरी करत आहे. ही चांगलीच गोष्ट आहे. तो सध्या गावागावात फिरून तिथली फॅशन, विविध प्रकारचे प्रिंट्स आणि डिझाईन्सचा अभ्यास करत आहे. मी त्याला जास्त उपदेश करत नाही. पण कोणाचेही नुकसान करू नकोस एवढेच त्याला सांगितले आहे. दरम्यान, आरव अक्षय आणि ट्विंकलचे पहिले अपत्य आहे. वयाच्या १५ व्या वर्षी तो उच्च शिक्षणासाठी परदेशात गेला असून सध्या लंडनच्या एका नामांकित युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेत आहे. त्याची धाकटी बहीण नितारा अनेकदा ट्विंकलच्या सोशल मीडिया पोस्टमध्ये दिसते. मात्र, आरवला प्रसिद्धीपासून दूर राहणे आणि साधेपणाने आयुष्य जगणे अधिक आवडते.

» अक्षय कुमार सध्या त्याच्या 'भूत बंगला' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. प्रियदर्शन यांच्या या हॉरर-कॉमेडी चित्रपटात परेश रावल, तब्बू, वामिका गब्बी आणि राजपाल यादव यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. अक्षयचा आगामी चित्रपट 'वेलकम टू द जंगल' हा आहे. हा चित्रपट २६ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. याशिवाय, अक्षय आणि सैफ अली खान यांची मुख्य भूमिका असलेला आणि प्रियदर्शन दिग्दर्शित 'हैवान' हा चित्रपटही लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

### प्रसिद्ध अभिनेत्री सई ताम्हणकरची विशेष मुलाखत

# कठोर परिश्रमाचे फळ मिळतेच!; मी आधीपासूनच आत्मनिर्भर अन् ठाम!

**'जे कठोर परिश्रम करतात, त्यांना त्याचे फळ मिळते,' असे प्रसिद्ध अभिनेत्री सई ताम्हणकरने म्हटले आहे. मराठी आणि हिंदी चित्रपटांमध्ये आपली प्रतिभा दाखवणाऱ्या सईने एक अष्टपैलू अभिनेत्री म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे. ती आपल्या प्रवासाकडे समाधान आणि आनंदाने पाहते आणि विनम्र राहते. सध्या ती तिच्या 'मटका किंग' या नवीन वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. यानिमित्ताने तिच्याशी झालेला संवाद...**



### कबड्डी, कराटे खेळायची...

सईने कधीही अभिनेत्री होण्याचे स्वप्न पाहिले नव्हते. ती सांगते, की माझे वडील जहाजावर काम करायचे आणि अनेकदा समुद्रप्रवासावर असायचे. घरी फक्त मी आणि माझी आई होतो. तिने मला नेहमी स्वावलंबी राहायला शिकवले. मला कणखर आणि आत्मविश्वासू बनवण्यात तिचा मोठा वाटा होता. शाळेत मला 'कबड्डी गर्ल' म्हणून ओळखले जायचे. माझे गुडघे नेहमी दुखायचे आणि माझ्यात पारंपरिक 'मुलींचे' गुण खूप कमी होते. मी एक टॉमबॉय होते. कॉलेजपर्यंत माझी हेअरस्टाईल मुलांसारखी होती. याच काळात मी कराटे शिकले आणि ऑरेंज बेल्ट मिळवला. माझ्या आईने आणि खेळांनी माझा आत्मविश्वास आणखी वाढवला. माझ्या स्पष्टवक्त्या आणि धाडसी स्वभावामुळे लोक माझ्यासमोर काहीही चुकीचे करायला कचरतात. माझा विश्वास आहे की प्रत्येक मुलगी आत्मनिर्भर आणि ठाम असावी.

### 'प्रादेशिक अभिनेत्री' हा शिक्का त्रासदायक

दाक्षिणात्य किंवा मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्रींना अनेकदा प्रादेशिक अभिनेत्री म्हणून संबोधले जाते. याबद्दल खंत व्यक्त करत सई म्हणते, की कधी कधी हे जाणून दुःख होते की असे का होते. आम्ही तर दोन्ही इंडस्ट्रीमध्ये तितक्याच समर्पणाने आणि मेहनतीने काम करतो. मात्र, भाषिक विभागणीचे दिवस आता गेले आहेत. या विषयावर, मी प्रेक्षकांना विनंती करू इच्छिते की त्यांनी आम्हाला आमच्या कामाच्या आधारावर पारखावे. माझ्यासारखे इतरही अनेक कलाकार आहेत जे हे साचे तोडण्यासाठी काम करत आहेत. हिंदीतील 'मिमी' या चित्रपटाने मला या टॅगमधून बाहेर पडायला मदत केली. मला पहिला फिल्मफेअर पुरस्कार आणि इतर अनेक पुरस्कार मिळाले.

### प्रियांका आणि सामंथाने बदल घडवून आणला...

पुरुषप्रधान इंडस्ट्रीमध्ये नायिकांपेक्षा नायकांना जास्त महत्त्व दिले जाते. या प्रश्नावर सई म्हणते, की गेल्या काही वर्षांत परिस्थिती बदलली आहे. प्रियांका चोप्रा आणि सामंथा रुथ प्रभू यांनी या बदलात मोठी भूमिका बजावली आहे. त्यांनी हळूहळू ते साचे तोडायला सुरुवात केली. पूर्वीच्या तुलनेत आज मी परिस्थितीत बदल पाहिला आहे; तेव्हा परिस्थिती खूपच वाईट होती. मानधनातील समानतेच्या मुद्द्यावर सई ताम्हणकर म्हणते, की जेव्हा नकारात्मक गोष्टी घडतात, तेव्हा त्यावर खूप गदारोळ होतो, पण सकारात्मक गोष्टींवर क्वचितच चर्चा होते. मला वाटते की मानधनातील समानताही बदलली आहे. आज नायिकांना नायकांच्या बरोबरीचे मानले जाते, असे सई म्हणाली.

### कधीकधी एकाच प्रकारच्या भूमिकांत अडकवतात...

सई हे मान्य करते की, लेबल लावण्यासोबतच अभिनेत्रींना अनेकदा एकाच प्रकारच्या भूमिकांमध्ये अडकवले जाते. ती म्हणते की, ही गोष्ट अनेक वर्षांपासून सुरू आहे. यावर मात करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे एकाच प्रकारच्या भूमिका टाळणे, पण ते खूप कठीण आहे. केवळ आमची इंडस्ट्रीच नाही, तर आमचा समाजही पुरुषप्रधान आहे, पण या पार्श्वभूमीवरही मुली उत्तम काम करत आहेत, असे सई म्हणाली.

### मानधनाचा त्याग

इंडस्ट्रीत दोन दशकांहून अधिक काळ घालवलेली सई आपल्या मानधनाबद्दल म्हणते, की माझ्याबद्दल बोलायचं झालं तर, कधीकधी मी माझ्या मनाप्रमाणे मानधन घेऊ शकले आहे, तर कधीकधी नाही. पण ज्या वेळी मी ते घेऊ शकले, त्या प्रसंगांनी मला खूप प्रोत्साहन दिले आहे. एका कलाकाराला माहीत असतं की आपलं मानधन कधी सोडावं आणि कधी ठाम राहावं. अभिनय हा व्यवसाय असूनही, आम्ही अनेकदा समाधानासाठी काम करतो. असे प्रसंग आले आहेत जेव्हा मी माझ्या मानधनाचा त्याग केला आहे. मी यूट्यूबसाठी एक वेब सीरिज केली होती. त्यासाठी मी माझ्या मानधनाचा त्याग केला, पण मला मिळालेला प्रतिसाद अतुलनीय आहे. त्या वेब सीरिजचं नाव 'बेरोजगार' होतं. त्या सीरिजनंतर माझ्या करिअरची दिशाच बदलली आणि लोकांचा माझ्यावरील विश्वास अधिक दृढ झाला. प्रेक्षकांच्या विश्वासाने मला आव्हानात्मक भूमिका स्वीकारण्यास प्रेरणा दिली आहे. उदाहरणार्थ, 'मटका किंग'मधील माझी मेकअपविना असलेली भूमिका खूप अर्थपूर्ण आणि आव्हानात्मक आहे.



**दिग्दर्शक आदित्य धर यांच्या 'धुरंधर' प्रमाणेच, त्याचा सिक्वेल 'धुरंधर : द रिव्हेंज,' याचे बॉक्स ऑफिसवरील आकर्षण कमी होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. चित्रपटाच्या यशाचा पुरावा म्हणजे प्रत्येक पात्र आणि कलाकाराला चांगला प्रतिसाद मिळत आहे. असाच एक अभिनेता म्हणजे आदित्य उप्पल, ज्याने या चित्रपटात पाकिस्तानचा एसीपी ओमर हैदरची भूमिका साकारली आहे. चित्रपटात हमजाचे (रणवीर सिंग) बिंग फोडणाऱ्या धडाडीच्या एसीपी ओमरच्या भूमिकेसाठी आदित्यला सर्वत्र प्रशंसा मिळत असली तरी, त्याला सोशल मीडियावर लोकांच्या रोषाचा आणि धमक्यांचाही सामना करावा लागत आहे.**

# लोकांकडून प्रेम अन् रोष; धमक्या मिळत आहेत...

### विशेष मुलाखतीत आदित्य उप्पलने सांगितला 'धुरंधर'च्या यशाचा परिणाम



चित्रपटाबद्दल मिळालेल्या सर्वात गोड कौतुकाबद्दल विचारले असता, आदित्य म्हणतो, की सर्वात छान कौतुक माझ्या मुलीकडून आलं, जेव्हा ती म्हणाली, की बाबा, तुम्हाला पाहून खूप मजा आली... दरम्यान, आदित्यला बाहेरून संमिश्र प्रतिक्रिया मिळत आहेत. काही जण त्याची प्रशंसा करतात, तर काही जण संतापून विचारतात, की तुम्ही हमजाला कसं पकडलं? तुम्ही यलिनाशी गैरवर्तन कसं केलंत? तुम्ही तिच्या मुलाला बंदूक कशी दाखवली? मात्र, लोकांवर प्रेम करण्याचा हा सुद्धा एक मार्ग आहे. बॉलिवूडमध्ये नशीब आजमावण्यासाठी स्वप्नांचे शहर मुंबईत असणे आवश्यक आहे, असे लोकांना सामान्यतः वाटत असले तरी, आदित्यला ही संधी त्याच्या मूळ गावी दिल्लीत राहूनच मिळाली. आपल्या अभिनयाच्या प्रवासाचे वर्णन करताना तो म्हणतो, की मी सुरुवातीपासूनच एक कलाकार आहे. मी दिल्लीत रंगभूमीवर काम केले. मी गुडगावमधील 'किंगडम ऑफ ड्रीम्स'मध्ये संगीताचे कार्यक्रम केले. मी बॉलिवूडमध्ये संघर्ष केला. ब्रेकनंतर, मला 'ओमेर्टा'सारख्या चित्रपटांमध्ये छोट्या भूमिकाही मिळाल्या, पण म्हणतात ना, मुंबई तुम्हाला सहजासहजी स्वीकारत नाही. कधीकधी तिथे वेळ लागतो किंवा परिस्थितीमुळे तुम्हाला परतावे लागते. माझ्या बाबतीतही असंच झालं; मी दिल्लीला परत आलो. कुटुंब असल्यामुळे मी व्यवसाय सुरू केला, पण अभिनयाची आवड कायम राहिली.

### मला जोरात मार...

आदित्यने सांगितलं, की रणवीर सिंगने खूप सहकार्य केले. छळाच्या दृश्यात, त्याने स्वतः मला त्याला जोरात मारायला सांगितले. मी सावध होतो. कारण माझ्या हातात स्टील फायबर असलेली काठी होती. त्यामुळे मला भीती वाटत होती की त्याला दुखापत होईल. पण तो म्हणाला, की मला तुझ्या पूर्ण ताकदीने मार, जेणेकरून त्याचा परिणाम पूर्ण होईल. आम्ही खूप सुधारणाही केली.

### सुरुवातीला नाकारली 'धुरंधर'ची भूमिका...

मी कास्टिंग करणाऱ्या लोकांना नियमितपणे भेटत होतो. पण, जेव्हा मुकेश छाबडा यांनी फोन केला, तेव्हा मी सुरुवातीला नाही म्हणालो. कारण मी कामात व्यस्त होतो. छोट्या भूमिकेमुळे मी थोडा नाराज झालो होतो, पण जेव्हा मी ते पात्र आणि दिग्दर्शकाचं नाव ऐकलं, तेव्हा भूमिका मिळाली नाही तरी चालेल, पण मी लगेच ऑडिशन द्यायला तयार झालो. माझी ऑडिशन दिल्लीत झाली. मुकेश छाबडा यांचं दिल्लीत ऑफिससुद्धा आहे. शिवाय, आता अनेक कास्टिंग कंपन्या सेल्फ-टेस्ट घेतात, त्यामुळे कलाकार कुठेही असले तरी त्यांना चित्रपटांमध्ये संधी मिळते. हो, पण जेव्हा तुम्ही मुंबईत राहता, तेव्हा काम मिळवणं सोपं जातं. तुमचे पर्याय वाढतात.

### 'संजय सरांनी माझी चिंता दूर केली...'

या चित्रपटात आदित्य हा संजय दत्तच्या टीममधील एक महत्त्वाचा सदस्य आहे आणि तो रणवीर सिंगला टॉर्चरही करतो. त्या दोघांसोबत काम करण्याच्या अनुभवाबद्दल बोलताना आदित्य म्हणाला, की संजय सर माझ्यासाठी वडिलांसारखे आहेत. त्यांच्यात एक जादू आहे. जेव्हा ते पडद्यावर येतात, तेव्हा ते जादू करतात. संजय सरांसोबत काम करण्याच्या पहिल्या दिवशी मी खूप घाबरलो होतो. अशा महान व्यक्तीसोबत काम करताना हे स्वाभाविक आहे. एका मोठ्या प्रोजेक्टमध्ये मला मिळालेली ही एक नवीन संधी होती, म्हणून मी त्यांच्या पाया पडलो आणि त्यांना मनापासून म्हणालो, सर, मी तुमचा खूप मोठा चाहता आहे आणि तुमच्या कामाचा खूप आदर करतो... मी थोडा घाबरलेलो आहे हे त्यांच्या लक्षात आले आणि आमची बरीच दृश्ये एकत्र असल्याने त्यांनी मला दिलासा दिला. ते म्हणाले, शांत राहा. तुला भविष्यात आणखी चांगले काम करायचे आहे. आपण खूप एकत्र काम करणार आहोत.

### प्रोपेगेंडा असता तर इतके प्रेम मिळाले नसते...



चित्रपट प्रचारकी असल्याच्या आरोपांबाबत आदित्य म्हणतो, की हा लोकांचा दृष्टिकोन आहे. हा चित्रपट अत्यंत स्पष्ट हेतू आणि उद्देशाने बनवला गेला आहे. म्हणूनच लोक त्याला इतकं प्रेम देत आहेत. केवळ भारतातच नाही, तर जगभरात सर्वांचे मनोरंजन होत आहे. जर तुम्ही केवळ काही विशिष्ट गोष्टींसाठी चित्रपटाला प्रचारकी म्हणत असाल, तर ते तुमचे मत आहे. आम्ही त्याबद्दल काहीही बोलू शकत नाही.

## चुकीच्या गोष्टी सहन करण्यापेक्षा नात्यातून बाहेर पडलेलं बरं...

### हंसिका मोटवानीचे स्पष्ट मत

अभिनेत्री हंसिका मोटवानी काही दिवसांपूर्वी तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आली होती. अभिनेत्रीने लग्नाच्या ३ वर्षांनंतर घटस्फोट घेतला. तिने उद्योजक सोहेल खातुरियासह लग्न केलं होतं. अशातच आता अभिनेत्रीने लग्न, प्रेम आणि हृदयभंग याबद्दल तिचं मत मांडलं आहे. हंसिकाने मुलाखतीत सांगितले, की हृदयभंग खूप त्रासदायक असतो. पण, आता आपल्याकडे असे अनेक पर्याय आहेत, ज्यामुळे आपण यामधून बाहेर येऊ शकतो. हंसिका पुढे म्हणाली, की बाहेर असे खूप लोक असतात जे तुम्ही काय केलं पाहिजे याबद्दल सांगत असतात. पण, आताच्या मुली खूप खंबीर आणि स्वतंत्र आहेत त्यामुळे त्या तेच करतात जे त्यांच्यासाठी चांगलं आहे. मी तरी कोणाचं ऐकलं नाहीये. आधी २५ व्या वर्षात लग्न करा, मग ३० व्या वर्षी लग्न करा बोललं गेलं आणि आता ४० व्या वर्षी लग्न करा असं म्हटलं जातं. पण लग्नच नाही तर कुठलीही गोष्ट तेव्हाच केली पाहिजे जेव्हा तुम्हाला वाटत असेल, असे हंसिका म्हणाली. कुटुंबीयांनी मला कधीच कुठल्याच गोष्टीसाठी जबरदस्ती केली नाही, असे ती म्हणाली. चुकीच्या गोष्टी सहन करण्यापेक्षा त्यामधून बाहेर पडलेलं बरं. मला माझ्या कुटुंबाचा खूप पाठिंबा आहे आणि मला याचा जराही पश्चाताप नाहीये. जे आहे ते छान आहे. मी आनंदी आहे, असेही ती घटस्फोटाबद्दल म्हणाली.

### पुन्हा प्रेम होणार का?

प्रेमाला दुसरी संधी देण्याबद्दल विचारल्यानंतर हंसिका म्हणाली, की जर माझ्या नशीबात प्रेम लिहिलं असेल तर मला ते मिळेल. माझा प्रेमावर विश्वास आहे. प्रेम खूप सुंदर असतं. पण, आता सध्या मला ते नको आहे. जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा माझ्या आयुष्यात पुन्हा प्रेम येईल. जर तुम्ही चुकीच्या ट्रेनमध्ये चढला असाल तर गरजेचं नाहीये की तुम्हाला पूर्ण प्रवास करावाच लागेल. त्रास होत असेल तर त्यातून बाहेर पडा, असे ती म्हणाली.

# राज्यात २० ते २२ एप्रिल दरम्यान वादळी वाऱ्यासह गारपीटीचा अंदाज

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रात अनेक भागांमध्ये मागील काही आठवड्यात अवकाळी पावसाचा जोरदार फटका बसला. यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान देखील झाले. त्यानंतर पुन्हा कडक उन्ह तसेच गर्मीत वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. उन्ह इतके वाढले की अकोल्यात उष्माघातामुळे एका रिक्षा चलकाचा मृत्यू झाल्याची देखील माहिती समोर आली होती. मात्र, आता पुन्हा राज्यात काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, यासंदर्भात मुख्यमंत्री कार्यालयाकडून माहिती देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री कार्यालयाने ट्विट करत माहिती दिली की, राज्यातील विविध भागांमध्ये पुढील काही दिवसांत हवामानात बदल होण्याचे संकेत मिळत असून २० ते २२ एप्रिलदरम्यान वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, खानदेश, मराठवाडा तसेच विदर्भातील काही भागांमध्ये दुपारनंतर आभाळ दाटून येत मेघगर्जनेसह पाऊस होऊ शकतो. या काळात विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा आणि काही ठिकाणी गारपीट होण्याचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार १९ एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट क्षेत्र, उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यात दुपारनंतर वादळी पावसाची स्थिती निर्माण होऊ शकते. त्यानंतर २० आणि २१ एप्रिल रोजी या पावसाचा प्रभाव अधिक भागांमध्ये जाणवण्याची शक्यता असून पुणे विभागासह मराठवाड्यातील दक्षिण भाग, छत्रपती संभाजीनगर विभाग आणि विदर्भातील अमरावती परिसरातही वादळी पावसाची शक्यता आहे. मात्र २२ एप्रिल रोजी या पावसाच्या क्षेत्रात आणि तीव्रतेत काहीशी घट होईल, असे संकेत आहेत. तसेच कृषी विभागाने शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, काढणी केलेली पिके सुरक्षित ठेवावीत, शेतीची कामे हवामानानुसार नियोजित करावीत आणि वादळी वारे व गारपीटीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पतीच्या महिला सेक्रेटरीची पत्नीकडून हत्या



**पुणे (प्रतिनिधी)** – पुण्यात एका वकिलाच्या ऑफिसमध्ये ३२ वर्षीय महिलेची हत्या झाली आहे. पोलिसांनी वकिलाची पत्नी आणि त्यांच्या अल्पवयीन मुलीला या गुन्ह्याप्रकरणी अटक केली आहे. अफेअरच्या संशयातून ही हत्या करण्यात आली आहे. पुण्याच्या चंदननगर भागात ही घटना घडली. मृत मुलीच्या कुटुंबियांची दिशाभूल करणे आणि गुन्हा लपवण्यासाठी मदत केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी वकिलाला सुद्धा ताब्यात घेतलं आहे. पूनम दिनेश मून असं मृत महिलेचं नाव असून ती येरवडा येथे रहायला आहे. मागच्या साडेतीन वर्षांपासून ती वकिल संजय सावंत यांच्या कार्यालयात सहाय्यक आणि सेक्रेटरी म्हणून त्यांच्यासोबत काम करत होती.

१६ एप्रिलला पूनम नेहमीप्रमाणे कामावर आली. संजय सावंत यांची पत्नी स्वातीला संशय आला की, पूनम आणि संजय यांचे अनैतिक संबंध आहेत. स्वाती आणि तिच्या अल्पवयीन मुलीने पूनमचे हात-पाय बांधले व तिला बॅटने मारहाण केली. यात तिचा मृत्यू झाला. गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत पूनम घरी आली नाही. म्हणून तिचा नवरा दिनेशने वकिल संजय सावंत यांना फोन लावला. पोलिसांननुसार, संजय सावंत यांनी त्यावेळी दिनेश यांची दिशाभूल केली. त्यांनी सांगितलं की, पूनम कदाचित तिच्या मैत्रीणीला भेटायला गेली असेल.

# केंद्र सरकारचा महत्त्वपूर्व निर्णय; महागाई भत्ता ६० टक्क्यांपर्यंत वाढणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – नोकरी करणाऱ्या सर्वसामान्य नोकरदारसंदर्भात एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. केंद्र सरकारच्या नोकरदारांना घरभाडे भत्ता वाढवण्याचा विचार केंद्र सरकार करता असल्याची माहिती आहे. केंद्रीय मंत्रिमंडळात या संदर्भात निर्णय झाल्याची सूत्रांची माहिती आहे. केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षी प्रभावाने घरभाडे भत्तालागू झाल्यास मोठा एरियसही मिळू शकतो. त्यामुळे या निर्णयाने वाढत्या भाडेपट्ट्या आणि महागाई दरम्यान बचत वाढवण्याचा प्रयत्न करणाऱ्या लाखो कर्मचाऱ्यांसाठी सरकारचे हे पाऊल वरदान ठरू शकते. दुसरीकडे, केंद्र सरकारने आज केंद्रीय कर्मचाऱ्यांना एक महत्त्वाची बातमी दिली आहे. सूत्रांनुसार, केंद्रीय मंत्रिमंडळाने केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांच्या महागाई भत्त्यात दोन टक्के वाढीस मंजुरी दिली आहे. या निर्णयानंतर, कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता आता वाढणार आहे.

या सरकारी निर्णयानंतर, कर्मचाऱ्यांचा एकूण महागाई भत्ता आता ५८ टक्क्यांवरून ६० टक्क्यांपर्यंत वाढला आहे. या वाढीचा थेट फायदा अंदाजे ५० लाख सरकारी कर्मचारी आणि ६५ लाखांहून अधिक निवृत्तीवेतनधारकांना होईल, ज्यामुळे त्यांच्या मासिक पगारात आणि निवृत्तीवेतनात वाढ होईल.

जर एखाद्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्याचा मूळ पगार रू.३६,५०० असेल, तर ६० टक्क्यांनी त्यांचा महागाई भत्ता आता रू.२१,९०० होईल. विशेष म्हणजे, कर्मचाऱ्यांना जानेवारीपासूनची थकबाकीही मिळणार आहे. नवीन नियम १ जानेवारी २०२६ पासून लागू होईल. याचा अर्थ असा की, कर्मचाऱ्यांना केवळ पुढच्या महिन्याचा वाढीव पगारच मिळणार नाही, तर मागील तीन महिन्यांची, म्हणजेच जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांची, थकबाकीसुद्धा एकाच वेळी मिळेल. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे, वाढत्या महागाईच्या काळात आपल्या उत्पन्नात वाढ करण्याची मागणी करणाऱ्या आणि काही काळापासून या घोषणेची वाट पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# शिक्षक पात्रता परीक्षेच्या आवेदनपत्रासाठी २४ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद कार्यालयामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीइटी) २०२६ परीक्षेचे रविवार २१ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी २४ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे परिषदेचे आयुक्त महेश चोथे यांनी कळविले आहे.

या परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी २७ मार्च ते १६ एप्रिल २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि परीक्षार्थी/ उमेदवारांमार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची मुदत वाढविण्याबाबतची विनंती लक्षात घेता ही मुदतवाढ देण्यात येत असल्याचे परीक्षा परिषदेमार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

# अखंड वीजपुरवठ्यासाठी राज्यात 'एआय'चा वापर

**मुंबई (प्रतिनिधी)** – वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची विक्रमी मागणी पूर्ण करतानाच, वीजनिर्मिती आणि पुरवठ्यात कोणताही व्यत्यय येऊ नये यासाठी आता 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा (एआय) आधार घेतला जाणार आहे. ऊर्जेचे नेटके व्यवस्थापन आणि तांत्रिक बिघाडांचा अंदाज घेण्यासाठी 'एआय'चा प्रभावी वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असून, यामुळे राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा नवा अध्याय सुरू होणार आहे.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे शनिवारी आयोजित उन्हाळ्यातील 'पीक डिमांड' आणि वीज वितरण व्यवस्थेच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. उन्हाळ्याचा वाढता तडाखा आणि आगामी पावसाळा या दोन्ही ऋतूंमध्ये वीजपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता असते. ही अडचण दूर करण्यासाठी केवळ पारंपरिक पद्धतींवर अवलंबून न राहता, ऊर्जा विभागाने तंत्रज्ञानाची जोड द्यावी, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. विशेषतः मागणीचा अचूक अंदाज वर्तवणे, देखभाल-दुरुस्तीची कामे नियोजित करणे आणि संभाव्य तांत्रिक धोके ओळखण्यासाठी 'एआय' यंत्रणा महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली ,ता. बिलोली यांचे कार्यालय**

**प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.**

अर्ज/आवक क्र.5038/2025

**!! जाहीर प्रगटन !!**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार श्री. राजु माधवराव गायकवाड, वय 46 धंदा शेती रा.रुद्रापुर ता.बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून **नामे कु. रत्नदिप राजु गायकवाड**, या मुलाचे जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा 2023 मधिल कलम 11(2) व (3) अन्वये दि.22/08/2025 रोजी जन्म नोंद आदेश घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांचा मुलगा **नामे कु. रत्नदिप राजु गायकवाड**, रा. रुद्रापुर ता. बिलोली यांचा जन्म दि.01/01/2011 रोजीची नोंद ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय रुद्रापुर ता. बिलोली जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, अर्जदार यांचा मुलगा **नामे कु. रत्नदिप राजु गायकवाड**, यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन पंधरा दिवसात या न्यायालयात स्वत: किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक 07/11/2025 रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

तालुका कार्यकारी दंडाधिकारी
बिलोली

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली ,ता. बिलोली यांचे कार्यालय**

**प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.**

अर्ज/आवक क्र.5037/2025

**!! जाहीर प्रगटन !!**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार श्री. राजु माधवराव गायकवाड, वय 46 धंदा शेती रा.रुद्रापुर ता.बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून **नामे कु. रूपेश राजु गायकवाड**, या मुलाचे जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा 2023 मधिल कलम 11(2) व (3) अन्वये दि.22/08/2025 रोजी जन्म नोंद आदेश घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांचा मुलगा **नामे कु. रूपेश राजु गायकवाड**, रा. रुद्रापुर ता. बिलोली यांचा जन्म दि.19/12/2015 रोजीची नोंद ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय रुद्रापुर ता. बिलोली जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, अर्जदार यांचा मुलगा **नामे कु. रूपेश राजु गायकवाड**, यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन पंधरा दिवसात या न्यायालयात स्वत: किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक 07/11/2025 रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

तालुका कार्यकारी दंडाधिकारी
बिलोली

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली ,ता. बिलोली यांचे कार्यालय**

**प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.**

अर्ज/आवक क्र.5039/2025

**!! जाहीर प्रगटन !!**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार श्री. राजु माधवराव गायकवाड, वय 46 धंदा शेती रा.रुद्रापुर ता.बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून **नामे कु. रितेश राजु गायकवाड**, या मुलाचे जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा 2023 मधिल कलम 11(2) व (3) अन्वये दि.22/08/2025 रोजी जन्म नोंद आदेश घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांचा मुलगा **नामे कु. रितेश राजु गायकवाड**, रा. रुद्रापुर ता. बिलोली यांचा जन्म दि.01/01/2012 रोजीची नोंद ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय रुद्रापुर ता. बिलोली जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, अर्जदार यांचा मुलगा **नामे कु. रितेश राजु गायकवाड**, यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रतिध्द झाले पासुन पंधरा दिवसात या न्यायालयात स्वत: किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक 07/11/2025 रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

तालुका कार्यकारी दंडाधिकारी
बिलोली

**जाहीर प्रगटन**

मौजे वसरणी ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील सर्व्हे नं. ५४/ए/१/२ पैकी दासगणु नगर मधील प्लॉट नं. १५३ ज्याची साईज लांबी – दक्षिण–उत्तर ४० फुट म्हणजे १२.१९ मीटर व रूंदी पूर्व–पश्चिम– ३० फुट म्हणजे ९.१४ मीटर ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२०० चौ.फुटाचा प्लॉट मूळ मालक सुकेशनी चंद्रकांत फुलवळकर रा. हनुमानगड नांदेड यांचेतर्फे नारायण बळीराम अंबुरे रा. बोरगाव ता. लोहा जि. नांदेड यांचेकडून सुरेखा सुनिल कदम रा. नंदनशिवणी ता. कंधार जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतु:सिमा– पूर्वेस – प्लॉट नं. १५४, पश्चिमेस – ओपन स्पेस, दक्षिणेस – प्लॉट नं. १५२ व उत्तरेस – २० फुट रूंद रोड.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत सुरेखा सुनिल कदम यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**सुरेखा सुनिल कदम**
**रा. नंदनशिवणी ता. कंधार जि. नांदेड**
**मो.नं. ७३७८४६२२९९, ९१४६०३६६९९**

जाहिरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ९६/२०२४** पुढील तारीख - १०.०६.२०२६

अर्जदार : शंकर दिगांबर अरगुलवार, वय. ५६ वर्षे, व्यवसाय- व्यापार, रा. गांधी चौक, बिलोली, ता. बिलोली ,जि. नांदेड.

**विरुध्द.**

भारतीय स्टेट बँक , बिलोली ता. बिलोली जि नांदेड.

**विषय- भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत...**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार हे **मयत जनाबाई दिगांबर अरगुलवार** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार हे **मयत जनाबाई दिगांबर अरगुलवार** यांचा मुलगा असुन **मयत जनाबाई दिगांबर अरगुलवार** यांचा मृत्यू दिनांक १४/१२/२०१९ रोजी मृत्यू झाला. **मयत जनाबाई दिगांबर अरगुलवार** यांचे गैरअर्जदार यांच्या शाखेत खालील तक्ता मध्ये दर्शविलेले खाते क्रमांक मध्ये रक्कम जमा आहे.

| अनु. क्र. | बँक नाव व शाखा | खाते क्र. | जमा रक्कम |
|---|---|---|---|
| ०१) | भारतीय स्टेट बँक , बिलोली ता. बिलोली जि. नांदेड. | ६२०४२२६२६०४ | १,८६,०४१/- |

वरील तक्तामध्ये दर्शविलेले रक्कम काढण्यासाठी अर्जदाराला वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदारांनी मा. न्यायालयात **मयत जनाबाई दिगांबर अरगुलवार** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील सर्व अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर मयताचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०.०४.२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,

कनिष्ठ लिपीक, दि.न्या.व.स्तर बिलोली

सहाय्यक अधिक्षक, दि.न्या.व.स्तर बिलोली.

जाहीर प्रगटन

**दिवाणी न्यायालय व.स्तर, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ९२/२०२६

अजिंक्य लक्ष्मणराव हाके वि. निरंक

अर्जदारः- अजिंक्य लक्ष्मणराव हाके, वय १८, व्यवसाय शिक्षण, रा. थेरबन, ता. भोकर, जि. नांदेड

**विरूध्द**

गैरअर्जदार :- निरंक.

दावा:- कलम २२२ व २७६ भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५ कायद्याप्रमाणे मयताचे प्रोबेट प्रमाणपत्र मिळणेबाबत..

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार याचे वडील मयत नामे **लक्ष्मण लक्ष्मणराव हाके** याचा मृत्यू दिनांक ०७/०३/२०२० रोजी झाला असून त्याच्या मृत्यूपत्राआधारे प्रोबेट प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. ऐ. आर. राठोड, यांच्यामार्फत अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदार यांच्या नावे मयतांचे मृत्यूपत्राआधारे वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरिता जर कोणाचा आक्षेप/उजर असल्यास त्यांनी सदर जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर, जि. नांदेड येथे आपण स्वतः, वकिलामार्फत हजर राहून लेखी स्वरूपात आपले म्हणणे /आक्षेप नोंदवावे, अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

फाईलिंग लिपीक, दिवाणी न्यायालय व.स्तर भोकर.

अधिक्षक, दिवाणी न्यायालय व.स्तर, भोकर.

**जाहिर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री. विठ्ठल माणिका भोसले वय 46 रा. थुगाव ता. जि. नांदेड यांनी दिनांक 13.02.2026 रोजी या कार्यालयात त्यांचे मुलीचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव गौरी विठ्ठल भोसले रा. थुगाव ता. जि. नांदेड यांचा राहते घर रा. थुगाव ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक **04.09.2011** या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक 13.02.2026 रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - 20.03.2026
स्थळ - नांदेड

तहसिलदार नांदेड करिता






रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना करा -पालकमंत्री अतुल सावे

## ◆ कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने घेतला आढावा



**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यात अलीकडे घडलेल्या गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस विभागाने अधिक दक्षता घ्यावी, तसेच शांतता व सुरक्षिततेच्या दृष्टीने ठोस उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली कायदा व सुव्यवस्थेबाबत बैठक पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नांदेड शहरात महिन्याच्या सुरुवातीला दोन दिवसांत घडलेल्या पाच खुनांच्या घटनांचा उल्लेख करत पालकमंत्री सावे यांनी ही बाब चिंताजनक असल्याचे नमूद केले. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर लक्ष ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले. शहर व जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर विशेष लक्ष ठेवावे, एमपीडीए अंतर्गत कारवाई वाढवावी, तसेच अचानक धाडी टाकून गुन्हेगारीला आळा घालावा, असेही त्यांनी सांगितले. अवैध वाळू उत्खनन, गुटखा, मटका व अंमली पदार्थांवर कठोर कारवाई करावी तसेच कुठल्याही राजकीय दबावाला बळी न पडता कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. जिल्ह्यात गुन्हेगारीला आळा बसविण्यासाठी स्थानिक गुप्तवार्ता वाढविण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पोलीस विभागाच्या अडचणी शासन स्तरावर सोडविण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन देत, सीसीटीव्ही प्रकल्प, पदभरती, पोलीस वसाहत व पोलीस आयुक्तालयाच्या प्रस्तावांबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सध्या निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर प्रभावी उपाययोजना राबवून नागरिकांचा विश्वास दृढ करण्यावर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यात मागील दीड वर्षातील गुन्हेगारीत झालेली घट व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचे सादरीकरण केले. पुढील काळातही जिल्ह्यात शांतता राखली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी २० ते २४ एप्रिल २०२६ दरम्यान पालक व विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली.

# गहाळ झालेले तीनशे मोबाईल मूळ मालकांना परत



**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणं व बाजारपेठांमधून हरवलेले आणि चोरीस गेलेले मोबाईल शोधण्यासाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत नांदेड पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या मोहिमेत तब्बल ३०३ अँड्रॉइड मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले असून, त्यांची एकूण किंमत सुमारे ४६ लाख ३ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणे, स्थानिक गुन्हे शाखा तसेच जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या पथकांनी संयुक्तरीत्या ही मोहीम राबवली. जानेवारी २०२६ पासून सुरू असलेल्या या मोहिमेदरम्यान विविध ठिकाणांहून हरवलेले मोबाईल शोधून काढण्यात आले.हस्तगत करण्यात आलेले सर्व मोबाईल शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयातून एकत्रितरीत्या नागरिकांना परत करण्यात आले. या उपक्रमात मिशन सहयोग आणि मिशन समाधान अंतर्गत पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मोबाईल परत देण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सायबर सेलचे वसंत सप्रे, मारुती चव्हाण यांच्यासह आदी उपस्थित होते.



**नांदेड** –अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ जिल्हा शाखेच्यावतीने 'परशुराम तेजोत्सव'चे कुसुम सभागृह येथे आयोजन करण्यात आले. यावेळी परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांची प्रमुख उपस्थिती होती. परशुराम तेजोत्सवाचे उद्घाटन शरद पोंक्षे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखील लातूरकर, डॉ. नितीन जोशी, मकरंद महाराज, अ‍ॅड. व्यंकटेश पाटनूरकर, यदुपक्ष अर्धापूरकर, वृषालीताई शेकदार, सोनल भोसेकर, विलास कौसडीकर, मोहिनी पत्की, विश्वजित देशपांडे, शंतनू सुभेदार, गोविंद गुरू, गोविंद कुलकर्णी, अ‍ॅड. गजानन पिंपरखेडे, अश्विनी चौधरी आदी. उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस, नांदेड)

## वारंवार वीज खंडित; देगलूरकर त्रस्त!

**देगलूर (प्रतिनिधी)** –देगलूर शहर व ग्रामीण भागात वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार वाढत असल्याने नागरिकांना गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. या प्रकारामुळे नागरीक त्रस्त होत आहेत.

लोडशेडिंगच्या नावाखाली शहरात गुरुवारी दिवसभर वीज नसते. याशिवाय इतर दिवशी व रात्री वारंवार वीज अचानक जात आहे. अनेक वेळा उच्च दाब व कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे नागरिकांच्या घरामधील इलेक्ट्रॉनिक उपकरणे नादुरुस्त होत असून, महावितरणच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांना उपकरणे दुरुस्तीसाठी आर्थिक भुर्दंड बसत असून, या प्रकारामुळे नागरिक त्रस्त होत आहेत.

# वीज चोरी करणाऱ्यास सहा महिन्यांची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यास मारहाण करणाऱ्या आरोपीस न्यायालयाने शिक्षा सुनावली असून, सात साक्षीदारांच्या साक्षी आणि वैद्यकीय पुराव्यांच्या आधारे आरोपी दोषी ठरला आहे.

दि. ६ मार्च २०२१ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास चौफाळा उपविभागातील तंत्रज्ञ विश्वदीप गंगाधर वाघमारे हे थकबाकी वसुलीच्या कामासाठी महंतवाडी परिसरातील भावेश्वरनगर भागात गेले होते. यावेळी आरोपी राजू यादवराव भुजबळे याने घरा- समोर बेकायदेशीरपणे विद्युत आकोडा टाकून वीज वापर करत असल्याचे निदर्शनास आले.

कर्मचाऱ्याने अनधिकृत जोडणी काढण्यास सांगितले असता आरोपीने विरोध करीत शिवीगाळ केली. त्यानंतर कर्मचाऱ्याने स्वतः आकोडा काढण्याचा प्रयत्न करत असताना आरोपीने लाकडी दांड्याने मारहाण करून जखमी केले.

या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा निर्माण केल्यासह आदी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# दत्ता डोंगरे यांना पत्नीवियोग



**भोकर (प्रतिनिधी)** – येथील सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक दत्ता डोंगरे हाळदेकर यांच्या सुविद्य पत्नी सौ. अनिता दत्ता डोंगरे यांचे शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता म्हैसा रोड विश्वकर्मानगर भोकर येथील राहत्या घरी निधन झाले. गेल्या काही काळापासून त्या आजारी होत्या.

शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता भोकर येथील बौद्ध स्मशानभूमीमध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. अनिता डोंगरे यांच्या पश्चात पती, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.

# बालविवाह रोखण्यासाठी जिल्ह्यात प्रशासन सतर्क; जिल्हाधिकाऱ्यांचे सर्व यंत्रणांना निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)** – अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर संभाव्य बालविवाह रोखण्यासाठी नांदेड जिल्हा प्रशासनाने विशेष सतर्कता बाळगली असून, सर्व विभागांना आवश्यक खबरदारी घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत.

बालविवाह प्रतिबंधासाठी जिल्ह्यात वेळोवेळी जनजागृती व प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात आले आहेत. तसेच सामूहिक विवाह सोहळ्यांदरम्यानही महिला व बाल विकास विभागाच्या सतर्कतेमुळे अनेक संभाव्य बालविवाह रोखण्यात यश आले आहेत, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. १९ एप्रिल २०२६ रोजी अक्षय्य तृतीया हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा मानला जातो. या काळात बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोणताही बालविवाह घडू नये यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने दक्ष राहावे, असे आदेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्गमित केले आहे.

बालविवाहाची माहिती मिळाल्यास तात्काळ ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका किंवा चाईल्ड हेल्पलाईन १०९८ वर संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# अर्धापूर तालुक्यात तीन वेगवेगळ्या अपघातात तिघे गंभीर जखमी

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या २४ तासांत अपघातांचे सत्र पाहायला मिळाले. नांदेड-भोकर फाटा, बारड ते भोकरफाटा-दाभड या मार्गावर झालेल्या तीन वेगवेगळ्या अपघातांमध्ये तिघेजण गंभीर जखमी झाले असून, काहीजण किरकोळ जखमी झाले आहेत. सुदैवाने रुग्णवाहिका चालकाच्या तत्परतेमुळे जखमींना वेळेत उपचार मिळाले आहेत.

शुक्रवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास धनराज सखाराम राठोड वय २८, रा. हदगाव हे आपल्या आईसोबत दुचाकीवरून भोकर फाटा ब्रिजखालून जात होते. यावेळी समोरील एका अज्ञात कारचालकाने अचानक ब्रेक दाबल्याने धनराज यांचा ताबा सुटला आणि



अपघात झाला. या घटनेत धनराज राठोड गंभीर जखमी झाले आहेत, तर त्यांच्या आई सविता सखाराम राठोड यांना किरकोळ मार लागला आहे. दुसरी घटना, शुक्रवारी रात्री १० वाजेच्या सुमारास बारड ते नांदेड रस्त्यावरील रामदेव ढाब्यासमोर आमराबाद पाटी जवळ घडली. प्रवीण शंकर मेंडके वय २६, रा. गवतवाडी, ता. हदगाव हे दुचाकीवरून जात असताना समोरून येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झाला. प्रवीण मेंडके यांच्या डोक्याला जबर मार लागला असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

तिसरी घटना, शनिवारी दुपारी पिंपळगाव महादेव पाटीजवळ रस्ता ओलांडत असताना दत्तराव माणिकराव बोडके वय ६५, रा. पिंपळगाव महादेव यांना एका भरधाव दुचाकीने जोराची धडक दिली. या धडकेत बोडके हे गंभीर जखमी झाले आहेत. या तिन्ही घटनांची माहिती मिळताच 'जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्य महाराज नानीजधाम संस्थान चे रुग्णवाहिका चालक राजू पाचंगे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी सर्व जखमींना तातडीने नांदेड येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

# मक्का- मदिना दर्शनासाठी १६ लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील अर्धापूर येथील एकाला मक्का मदिनाचे दर्शन घडवून आणण्याचे आमिष दाखवून तब्बल १६ लाख १० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २४ मे २०२५ ते २ सप्टेंबर २०२५ दरम्यान अर्धापूर येथे ही घटना घडली. सोहेल अहमद खान रफीक अहमद आणि अफरिन खान सोहेल अहमदखान (दोघे रा. बद्दापूर, ता. अकोला) यांनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदारांना मक्का मदिना दर्शन घडवून आणण्याचे आश्वासन दिले. या बहाण्याने आरोपींनी फिर्यादीकडून बँक ऑफ बडोदा खात्यावर तसेच नूर हज उमरा टुर्स अँड ट्रॅव्हल्स या नावाने दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क ठेवत वेळोवेळी एकूण १६ लाख १० हजार १०० रुपये उकळल्याचे समोर आले आहे. मात्र पैसे घेतल्यानंतरही प्रत्यक्ष दर्शनाची कोणतीही व्यवस्था न करता फसवणूक केल्याचा आरोप शेख अति उर्रहमान शेख वली यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोउनि भोसले करीत आहेत.

# जो समाज स्वत:ला विसरतो, त्याचे नेतृत्त्व इतर करतात -शरद पोंक्षे

**नांदेड (प्रतिनिधी)** – हिंदू समाजाला जाती, पोटजाती, उपजाती आणि कृत्रिम भिंतींमध्ये विभागण्यात आले. त्यामुळे समाजाची एकत्रित शक्ती कमकुवत झाली. ब्राह्मण, मराठा, धनगर, माळी, कुंभार, लोहार, सोनार, चांभार अशा विविध ओळखी असल्या तरी त्यापूर्वी आपण हिंदू आहोत, ही जाणीव प्रबळ झाली पाहिजे. जो समाज स्वतःला विसरतो, त्याचे नेतृत्त्व इतर करतात; पण जो समाज स्वतःचे स्वत्व ओळखतो, तो इतिहास घडवतो, असे मत हिंदुत्ववादी विचारवंत तथा सिनेअभिनेते शरद पोंक्षे यांनी नांदेड येथे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ आयोजित श्री परशुराम तेजोत्सव कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात व्यक्त केले.

स्वत्वाची जाणीव, इतिहासाचा अभिमान, संस्कृतीचे ज्ञान आणि संघटनेची ताकद या चार आधारस्तंभांवर समाजाचे पुनरुत्थान शक्य आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गोविंद कुलकर्णी होते. व्यासपीठावर परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे पदाधिकारी विलास कौसडीकर, मोहिनी पत्की, सोनल भोसेकर, महोत्सवाचे संयोजक निखिल लातूरकर, विश्वजीत देशपांडे, शंतनू सुभेदार, सद्गुरू मकरंद महाराज, गोविंदगुरु आदी उपस्थित होते.

वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवद्गीता आणि संतवाङ्मयाचा अभ्यास मातृभाषेतून व्हावा, असे त्यांनी सांगितले. गुरुकुल शिक्षणपद्धती, चारित्र्यनिर्मिती, कन्याशिक्षण, स्त्रीसन्मान, मतदानाचे सांस्कृतिक उत्तरदायित्व, पर्यावरणरक्षण, गोसंवर्धन व नद्यांचा सन्मान यांवरही त्यांनी भाष्य केले. इतिहासाच्या विकृतीकरणावर बोलताना त्यांनी अनेक वीरांचे पराक्रम झाकोळले गेले आणि आक्रमकांचे महिमामंडन झाले, अशी खंत व्यक्त केली. चित्रपट, पुस्तके आणि शिक्षणातून जर राष्ट्रनायक दुर्लक्षित राहिले, तर नव्या पिढीत स्वाभिमान कसा निर्माण होणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, विनायक दामोदर सावरकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांसारख्या महामानवांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना कॅप्टन आशिष दामले यांनी परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांची माहिती दिली. समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक उन्नतीसाठी महामंडळ सक्षम व्यासपीठ ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महिलांसाठी २० लाखांपर्यंत कर्जसाहाय्य, वैयक्तिक उद्योजकांसाठी १५ लाखांपर्यंत व्याज परतावा, गट प्रकल्पांसाठी ५० लाखांपर्यंत व्याज सहाय्य, युवकांना उद्योजकतेचे प्रोत्साहन, वेदाध्ययन व संस्कृत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, पुरोहितांसाठी विमा व निवृत्तीवेतन योजना राबविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

# शहरातील कामठा परिसरातून सव्वा दोन किलो गांजा जप्त; दोघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या कामठा फाटा परिसरातील म्हैस बाजारामध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कारवाई करून सव्वादोन किलो गांजा जप्त केला आहे. यावेळी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि मिलिंद सोनकांबळे व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे शहर परिसरात गस्त घालण्यास सुरुवात केली.

त्यावरून दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी पोउपनि मिलिंद सोनकांबळे व त्याचे पथकातील अंमलदार यांना पो. स्टे. विमानतळ हद्दीतीत शंकरराव चव्हाण चौक येथील म्हशीचा बाजार समोरील रोडलगत एकजण बेकायदेशिररित्या अंमली पदार्थ गांजाची विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने राजपत्रीत अधिकारी, शासकीय पंच व स्टाफसह १९.४५ वाजता घटनास्थळी छापा मारला असता तेथे एक जण संशयास्पद हालचाल करीत असताना दिसला. त्यास ताब्यात घेवून त्याची चौकशी केली असता त्याने त्याचे नाव सय्यद सदरु सय्यद सलीम (वय २९ वर्षे व्यवसाय बेकार रा. बाबा कॉलनी सांगवी) व शेख शफी रा. मेहबूबनगर, नांदेड असे सांगितले. त्याच्या ताब्यातील पिशवीची झडती घेतली असता २ किलो २५१ ग्रॅम अंमली पदार्थ गांजा मिळून आल्याने पंचासमक्ष जप्त करण्यात आला

या घटनेतील आरोपी क्रमांक १ यास सदरचा मुद्देमाल हा कोणाकडून खरेदी केला आहे अशी विचारपूस केली असता त्याने सदरचा मुद्देमाल हा आरोपी शेख शफीकडून खरेदी केल्याची कबुली दिली आहे. जप्त मुद्देमाल व आरोपी पो. स्टे. विमानतळ, नांदेड यांचे ताब्यात देऊन त्याचेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com